पुणे - ४११००५.
17 FEB 2013
आवक क्रमांक:- 279
शाखा:-

(3)

अ.शा.पत्र.क्र.:एसएससी-२०१३/(०५/१३) उमाशि-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १५ फेब्रुवारी, २०१३.

महाराष्ट्र शासन

**ज.स.सहारिया,**
अप्पर मुख्य सचिव

**विषय :- इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी "कॉपीमुक्त अभियान" राबविण्याबाबत.**

**प्रिय श्री.**

शिक्षणाचा हक्क या कायद्यामुळे राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी शासनावर आली आहे. ही जबाबदारी पार पाडतांना शिक्षण व्यवस्थतेतील विद्यार्थ्यांना शाळेची सहज उपलब्धता (Access) आणि त्यासोबत गुणवत्तेवरदेखील भर द्यावा लागणार आहे. गुणवत्तेचे मूल्यमापन शिक्षण मंडळ व शिष्यवृत्ती परीक्षेच्या माध्यमातून होत असतांना, परीक्षा व्यवस्थेमधील त्रुटी दूर करणे आवश्यक झाले आहे.

इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०१३ मध्ये आयोजित करण्यात आल्या आहेत. या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणाऱ्या परीक्षा आहेत. त्यामुळे या परीक्षांमध्ये होणारे गैरप्रकार हे प्रामाणिक व मेहनती विद्यार्थ्यांच्या मनोबलाचे खच्चीकरण करु शकतात. राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी व कल्याणकारी राज्याच्या उभारणीसाठी हे निश्चितच भूषणावह नाही.

२. संपूर्ण राज्यासाठी एक नियोजनबद्ध व सर्वघटक समावेशक गैरमार्गाशी लढा या अभियानाचा कृति कार्यक्रम गतवर्षी राज्यमंडळामार्फत संपूर्ण राज्यभर राबविण्यात आला. त्यामुळे परीक्षेशी संबंधित घटकांच्या विशिष्ट वैचारिक मनोवृत्तीमध्ये सकारात्मक बदल होण्यास व परीक्षेतील गैरप्रकार कमी होण्यास मदत झाली. राज्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये कॉपीमुक्त अभियानाची कठोर अंमलबजावणी करुन इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी प्रशासनाला भरीव यश मिळाले आहे. असे असूनही राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये या अभियानाची अंमलबजावणी आवश्यक त्या परिणामकारकपणे झालेली नाही असे निदर्शनास आले आहे.

३. महाराष्ट्रातील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व अधिक जबाबदार भावी पिढी निर्माण व्हावी, याकरिता **"कॉपीमुक्त अभियान"**सारखे उपक्रम हा एक महत्वाचा टप्पा आहे. सदर अभियानाची अंमलबजावणी यावर्षीसुद्धा करण्यात येणार आहे. आपल्या विभागामध्ये / जिल्ह्यामध्ये कॉपीमुक्त अभियानाचे सुयोग्य नियोजन व अंमलबजावणी करणे सर्व संबंधित यंत्रणांच्या सहकार्याने आपणांस शक्य आहे. यास्तव, मी आपणांस विनंती करु इच्छितो की, महाराष्ट्राची कतृत्ववान भावी पिढी निर्माण करण्यासाठी व परीक्षा पद्धतीवरील सामान्य जनतेचा विश्वास व आदर वृद्धींगत करण्यासाठी आपण वैयक्तिकरित्या या अभियानाचे नेतृत्व करुन सर्व संबंधित यंत्रणांच्या मदतीने हे अभियान यशस्वी करावे. त्यामुळे आता येऊ घातलेल्या सन २०१३ मधील इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षा पारदर्शक वातावरणात पार पाडण्यास आपले सर्वांचे सामूहिक प्रयत्न निश्चितच यशस्वी होतील, असा माझा विश्वास आहे.

शुभेच्छासह!

**आपला स्नेहांकित,**

(स्वाक्षरी) १२/४/१३

**(ज.स.सहारिया)**

**प्रति,**

**श्री. विजय नहाटा, विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई.**
**श्री.रविंद्र जाधव, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.**
**श्री.प्रभाकर देशमुख, विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.**
**श्री.संजीव जयस्वाल,विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद.**
**श्री.डी.आर.बन्सोड,विभागीय आयुक्त, अमरावती विभाग,अमरावती.**
**श्री.बी.वेणूगोपाळ रेड्डी,विभागीय आयुक्त, नागपूर विभाग,नागपूर.**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित, अध्यक्ष, राज्यमंडळ, पुणे.**

परीक्षा प्राधान्य  महाराष्ट्र शासन

क्रमांक.: एसएससी-२०१३/(०५/१३) उमाशि-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २७ फेब्रुवारी, २०१३.


म.रा.मा. ... शिक्षण मंडळ
पुणे - ४११००५.
2 8 FEB 2013
आवक क्रमांक:- 348


प्रति,

१) विभागीय आयुक्त, नागपूर
२) विभागीय आयुक्त, पुणे
३) विभागीय आयुक्त, नाशिक
४) विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**विषय :- इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी "कॉपीमुक्त अभियान" राबविण्याबाबत.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता १२वीच्या परीक्षां सध्या राज्यात सुरु आहेत. दिनांक २१,२२ व २३ फेब्रुवारी,२०१३ रोजी परीक्षा कालावधीत आढळून आलेल्या गैरमार्ग प्रकरणांची माहिती विभागीय मंडळांकडून प्राप्त झाली असून तिचे अवलोकन केले असता आपल्या विभागात गैरमार्ग प्रकरणांची संख्या इतर विभागांपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. तरी याप्रकरणी आपण व्यक्तिशः लक्ष देऊन संबंधितांना योग्य त्या सूचना आपल्या स्तरावरुन द्याव्यात ही विनंती.

(आ.भ.रामटेके)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित:-**

१) सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ), पुणे.
२) विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
३) विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर
४) विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, औरंगाबाद
५) विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक.